
ऑलिंपिक स्पर्धांची कहाणी

लेखिका: मिन्ना लेसी

चित्रे: पॅडी माउंटर



ऑलिंपिक स्पर्धांची कहाणी

मराठी अनुवादः सुशील मेन्सन



अनुक्रम



प्रकरण 1

प्राचीन ग्रीसमधील खेळ



प्राचीन ग्रीक लोकांना स्पर्धा करायला आवडत असे. ते अनेक कलाकौशल्यपूर्ण गोष्टींच्या स्पर्धा आयोजीत करत. जसे, सार्वजनिक भाषण, चित्रकला, लेखन आणि अगदी चुंबनाच्याही!

पण सर्वात लोकप्रिय स्पर्धा होत्या खेळांच्या, जसे धावण्याची शर्यत, रथांची शर्यत, मुष्टियुद्ध, कुस्ती, थाळीफेक.

कोणताही मोठा कार्यक्रम असला की खेळांच्या स्पर्धा भरवायला चांगला बहाणा मिळत असे. ग्रीक लोक मेजवान्या आणि धार्मिक उत्सवांप्रसंगी, तसेच अंत्यसंस्कारावेळीही शर्यती आणि कुस्त्यांच्या स्पर्धा भरवत.



युद्धावर निघतानाही ते आपले भाले आणि थाळ्या सोबत नेत.

प्रकरण दोन

पहिली स्पर्धा



ऑलिंपिक स्पर्धांची सुरुवात कशी झाली, हे कुणालाही निश्चितपणे माहीत नाही. पण खेळांच्या पहिल्या स्पर्धेचे आयोजन सुमारे 3000 वर्षांपूर्वी ई.स. 776 साली *ऑलिंपिया* गावात करण्यात आले होते, अशी नोंद सापडते.

ऑलिंपिया हे नदीखोऱ्यात वसलेले एक रमणीय गाव होते. त्याच्या सभोवती ऑलिव्ह वृक्षांची राई आणि नैऋत्येला डोंगररांगा होत्या.

ग्रीक देवतांचा राजा *झ्यूस* आणि त्याची राणी *हेरा* यांची पूजा करण्यास लोक ऑलिंपियाला भेट देत असत.

एका कहाणीनुसार, झ्यूसचा मुलगा, ग्रीक हिरो *हेराक्लीझ* याने ऑलिंपिक स्पर्धा भरवायला सुरुवात केली.



दुसऱ्या एका कहाणीनुसार, लिडियाचा राजपुत्र *पेलॉप्स*च्या अंत्यसंस्काराप्रसंगी त्याच्या स्मरणार्थ खेळांच्या स्पर्धा भरवण्यात येऊ लागल्या. खूप वर्षांपूर्वी, पेलॉप्सने रथांची शर्यत जिंकली होती. तो एका सुंदर राजकन्येला आपली वधू म्हणून जिंकण्यासाठी शर्यतीत सहभागी झाला होता.



पण बहुधा या स्पर्धेची सुरुवात ऑलिंपियात झ्यूसची स्तुती करणाऱ्या एका मोठ्या धार्मिक उत्सवाच्या प्रसंगी झाली असावी.




सुरुवातीला, केवळ एकाच खेळाची स्पर्धा झाली - मैदानाच्या लांबीइतके अंतर, म्हणजे 190 मीटर (623 फूट) धावण्याची शर्यत.

यात सर्व स्पर्धक ग्रीक पुरुष होते. ज्या स्त्रियांना शर्यतीत भाग घ्यावासा वाटे, त्यांच्यासाठी वेगळी शर्यत ठेवत. त्याला *हेराया* म्हणत.




ई.स. पूर्व 776 पासून, ऑलिंपियामध्ये दर चार वर्षांनी, सहसा ऑगस्ट महिन्यात, अशा स्पर्धा भरवण्यात येऊ लागल्या. दोन स्पर्धांदरम्यान असलेल्या चार वर्षांच्या कालावधीला *ऑलिंपियाड* म्हणत असत.

प्राचीन ग्रीसमध्ये पुरुष धावपटूंनी विवस्त्र अवस्थेत धावायचे, अशी परंपरा होती. यातून पुरुषांना आपले बलदंड शरीर आणि पिळदार स्नायू दाखवायची संधी मिळत असे.




स्पर्धेआधी हलका व्यायाम करण्यापूर्वी, प्रत्येक धावपटू ऑलिव्ह तेलाने आपल्या शरीराचे मालिश करत असे. पैलवान लोक धरपकड चांगली होण्यासाठी अंगावर पावडर आणि वाळूही लावत.



काळानुसार, ऑलिंपिक स्पर्धा ग्रीसमधील सर्वात लोकप्रिय क्रीडा उत्सव बनला. तो बघायला इटली, सीरिया, इजिप्त, काळा समुद्र या दूरदूरच्या ठिकाणांहून हजारो लोक येऊ लागले.

ई.स. 456 वर्षांपूर्वी, ऑलिंपियामध्ये झ्यूसचे एक भव्य मंदिर उभारण्याचे काम पूर्ण झाले. ते बघायला लोकांची प्रचंड गर्दी होत असे.

लोक झ्यूसचा 13 मीटर (43 फूट) उंच पुतळा बघण्यासाठी रांगेत उभे राहात.



त्याकाळात, फक्त पुरुष आणि कुमारी स्त्रियाच मृत्युचा खेळ बघू शकत असत. एक विवाहीत स्त्री आपल्या मुलाची मुष्टियुद्ध स्पर्धा बघायला प्रशिक्षकाचा वेष धारण करून गेली. पण मुलगा जिंकल्यावर, ती आनंदाने ओरडली आणि तिचे बिंग फुटले. सुदैवाने, मुलाचे वडील आणि भाऊ ऑलिंपिक चॅम्पियन होते. त्यामुळे त्या स्त्रीचा जीव वाचला.



तेव्हापासून प्रशिक्षकांनी स्पर्धा विवस्त्रावस्थेत पाहावी, असे बंधन घालण्यात आले.

प्रकरण 3

खेळांचे सादरीकरण




दर चौथ्या वसंत ऋतूत, तीन दूत शांतता कालावधीची घोषणा करण्यासाठी संपूर्ण ग्रीसचा दौरा करत. यामुळे ऑलिंपिया परिसरात स्पर्धांच्या एक महिना आधी आणि एक महिना नंतर या कालावधीत युद्ध थांबवत असत. याला *ऑलिंपिक युद्धविराम* म्हणत असत.

ग्रीक लोक सतत युद्ध करत असत. पण युद्धविरामादरम्यान, ऑलिंपियाच्या परिसरात युद्धबंदी घोषीत करत, जेणेकरून ऑलिंपिक उत्सवात भाग घेण्यासाठी लोकांना सुरक्षितपणे प्रवास करता यावा.



युद्धविराम समाप्त होताच लोक पुन्हा युद्ध करायला जात.

स्पर्धा सुरु झाल्यापासून 100 वर्षांनी, ऑलिंपिकमध्ये 18 प्रमुख खेळ होऊ लागले. स्पर्धेची सुरुवात रथांच्या शर्यतीने होत असे. याला *टेथ्रिप्पॉन* म्हणत. ही शर्यत *हिप्पोड्रोम* नावाच्या मैदानात होत असे.



स्पर्धेचे प्रमुख आकर्षण होते, *पेंटाथलॉन.* यात पाच खेळ होत असत. एका आख्यायिकेनुसार, ही कल्पना *जेसन* नावाच्या ग्रीक हिरोच्या सुपीक डोक्यातून निघाली होती. पहिल्या पेंटाथलॉनमध्ये जेसन आपला मित्र *पेल्युस*चा प्रतिस्पर्धी होता.

पेंटाथलॉनमध्ये

थाळीफेक....



भालाफेक....



धावण्याची शर्यत....



कुस्ती....



आणि लांब उडी
हे खेळ होते.





ऑलिंपिक विजेत्यांना ऑलिव्हच्या पानांचा मुकुट घालत असत आणि त्यांच्यावर कविता आणि गाणी रचत असत. संपूर्ण ग्रीसमध्ये या कविता आणि गाणी ऐकवल्या जात असत.




सर्वात भयानक खेळ होता, एक रानटी पद्धतीने केली जाणारी मारामारी. त्याला *पॅंक्रेशन* म्हणत. यात पुरुष ठोसे आणि लाथा मारून एकमेकांची हाडे मोडू शकत. पण खेळाडुला चावण्याची आणि डोळे फोडण्याची परवानगी नव्हती.

ई.स. पूर्व दुसऱ्या शतकात, रोमन लोकांनी ग्रीसवर विजय मिळवला, त्यावेळी ऑलिंपिक स्पर्धा खूप लोकप्रिय होत्या.

पण ऑलिंपिक सुरू झाल्यानंतर, 1166 वर्षांनी, ई.स. 393 मध्ये, *थिओडोसिअस* या ख्रिस्ती सम्राटाने या स्पर्धांवर बंदी आणली. त्याच्या सैनिकांनी झ्यूस देवतेचे मंदिर उध्वस्त केले.





नंतरच्या वर्षांमध्ये, ऑलिंपिया गावसुद्धा उध्वस्त झाले. भूकंप आणि पूर या आपत्तींमुळे स्पर्धेची जागा जमिनीखाली गुडुप झाली.


1000 पेक्षा जास्त वर्षे ही जागा जमिनीखालीच लपून राहिली....

प्रकरण 4

एक भव्य योजना



1875 मध्ये, जर्मन पुरातत्वज्ञ *अन्स्ट कर्टीयस* याने ऑलिंपिया गावाच्या अवशेषांमध्ये मंदिरे, शिल्पे आणि भांड्यांचा शोध लावला. यामुळे प्राचीन खेळांमध्ये लोकांना पुन्हा रस वाटू लागला.



एक फ्रेंच धनिक, *बॅरन पियरे डी क्युबर्टीन,* यांना ऑलिंपिकने भुरळ पाडली. त्यांनी ऑलिंपिकबद्दल मिळेल ती माहिती वाचली. डी क्युबर्टीन स्वत: एक उत्साही मुष्टियोद्धा, तलवारयोद्धा, नौकाचालक आणि घोडेस्वार होता. त्यांचा दृढ विश्वास होता की खेळल्यामुळे माणूस जास्त बळकट आणि यशस्वी बनू शकतो.

त्यांनी विविध देशांत खेळ कसे खेळले जातात, याचा अभ्यास केला. इंग्लंडमध्ये रग्बीसारखा भयानक चढाओढीचा खेळ शाळेत खेळला जात होता. डी क्युबर्टीनला या गोष्टीचे मोठे कौतुक वाटले.



त्यांनी इंग्लंडमध्ये *मच वेनलॉक* नावाच्या एका छोट्या शहराचाही दौरा केला, जिथे एक खेळांचा उत्सव आयोजित केला जात असे. या उत्सवाला *वेनलॉक ऑलिंपियन खेळ* म्हणत असत.

यावरून त्यांच्या मनात एक कल्पना चमकली. 1892 साली, क्रीडा अधिकाऱ्यांनी एका सभेत, डी क्युबर्टीनने एक आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक स्पर्धा सुरू करण्याची आपली योजना जाहीर केली.



डी क्युबर्टीनने आपले प्रयत्न सोडून दिले नाहीत. त्यांनी दोन वर्षे अथकपणे जगभरातील नेत्यांना पत्रे लिहिली आणि त्यांच्याशी चर्चा केली. शेवटी, त्यांनी क्रीडा अधिकाऱ्यांची एक बैठक आयोजीत केली. यावेळी, त्यांची योजना स्वीकारण्यात आली. डी क्युबर्टीन रोमांचित झाले.



त्यांचे पुढील काम होते, नव्या ऑलिंपिक स्पर्धांच्या आयोजनासाठी एक गट बनवणे. याला *आंतरराष्ट्रीय ऑलिंपिक समिती (आयओसी –IOC)* म्हणून ओळखले जाऊ लागले.


प्रकरण 5

एक यशस्वी सुरुवात



पहिली अधिकृत आधुनिक ऑलिंपिक स्पर्धा 6 एप्रिल 1896 रोजी ग्रीसमधील *अथेन्स* शहरात खेळल्या गेल्या.

नऊ वेगवेगळ्या खेळांच्या स्पर्धांमध्ये 14 देशांतील पुरुष मैदानी खेळाडूंना बघण्यासाठी हजारो प्रेक्षक गोळा झाले. या स्पर्धा होत्या – शर्यत, सायकल शर्यत, तलवारयुद्ध, जिम्नॅस्टीक्स, शूटींग, पोहोणे, टेनिस, वजन उचलणे आणि कुस्ती.



स्त्रियांना खेळ फक्त बघण्याची परवानगी होती. डी क्युबर्टीनच्या मते, स्त्रिया खेळ खेळण्यासाठी नाजूक असतात.

कित्येक धावपटूंची एक अत्यंत मोठी समस्या होती, अथेन्सचा प्रवास. *जेम्स कोनोली* नावाच्या एका अमेरिकीने आपल्या आयुष्याची जवळजवळ सारी ठेव न्यूयॉर्क ते नेपल्स बोट प्रवासावर खर्च केली. या प्रवासाला त्याला 17 दिवस लागले.



पण हा प्रवास बराच म्हणायचा. कोनोलीने *तिहेरी उडी (ट्रीपल जम्प)* प्रकारात यश मिळवले. अशाप्रकारे त्याने या आधुनिक स्पर्धेतील पहिले पदक जिंकले.

त्याकाळी प्रवेशाचे नियम फारसे कठोर नव्हते. *जॉन बोलँड* नावाच्या एका आयरिश पर्यटकाने शेवटच्या मिनिटाला स्पर्धेत नाव नोंदवले....आणि तो टेनिस एकल आणि दुहेरी स्पर्धा जिंकला.



विशेषत: पोहोणाऱ्यांना कणखर राहावे लागत असे. त्यांना नावा घेऊन खुल्या समुद्रात उडी घ्यावी लागत असे आणि बर्फाळ गार पाण्यात किनाऱ्याकडे पोहत जावे लागत असे.

अथेन्स ऑलिंपिकमध्ये, 40 किमी (सुमारे 25 मैल) मॅराथॉन शर्यत ही कल्पना प्रत्यक्षात उतरली. ही स्पर्धा त्या ऑलिंपिकचे मुख्य आकर्षण ठरले.

मॅराथॉन शर्यत ही *फिडीप्पिड्स* नावाच्या एका ग्रीक सैनिकाच्या कहाणीवरून स्फुरली होती. ई.स. पूर्व 490 मध्ये, ग्रीकांनी पर्शियनांवर विजय मिळवला. ही खबर देण्यासाठी तो मॅराथॉन गाव ते अथेन्स हे अंतर धावत गेला होता.



जेव्हा अथेन्सची पहिली मॅराथॉन शर्यत पूर्ण होत आली तेव्हा जमावाने अक्षरश: मैदानात उड्या घेतल्या, कारण *स्पिरिडॉन लुईस* नावाच्या एक ग्रीक धावपटूने शेवटची फेरी मारण्यास मैदानात प्रवेश केला होता.



आपला उत्साह उतू गेल्यामुळे, दोन ग्रीक राजपुत्र, ग्रीसच्या राजा जॉर्ज । ची मुले, मैदानात उतरले आणि लुईससोबत अंतिम रेषेपर्यंत धावले.

प्रकरण 6

खेळांचा विस्तार

एका यशस्वी सुरुवातीनंतर, IOC ने दर चार वर्षांनी, दुसऱ्या शहरात ऑलिंपिक स्पर्धा भरवण्याचा निर्णय घेतला.

1900 साली, या स्पर्धा फ्रान्समधील पॅरिसमध्ये आयोजीत करण्यात आल्या. या स्पर्धेत स्त्रियांना सहभागी होण्याची परवानगी होती, पण केवळ गोल्फ आणि टेनिससारख्या नाजूक खेळांमध्ये.



लंडनमध्ये राजा *एडवर्ड VII* आणि राणी *अलेक्झांड्रिया* यांना मॅराथॉनची सुरुवात आपल्या *विंडसर कॅसल* या राजमहालातून पाहायची इच्छा होती.



1904 साली अमेरिकेतील *सेंट लुईस* शहरात झालेल्या ऑलिंपिकनंतर IOC ने 1908 सालचे ऑलिंपिक खेळ इटलीतील रोम शहरात भरवण्याचे मान्य केले. पण इटलीत ज्वालामुखी *माउंट व्हेसुव्हियस* उफाळून आल्यामुळे त्या वर्षीच्या ऑलिंपिकचे स्थलांतर लंडनमध्ये करण्यात आले.

त्यामुळे मॅराथॉनचे अंतर 42.195 किमी (26 मैल 385 गज) पर्यंत वाढवण्यात आले. तेव्हापासून आजपर्यंत, प्रत्येक मॅराथॉनमध्ये हेच अंतर ठेवले जाते.

लंडन ऑलिंपिकमध्ये लोकांनी पहिल्यांदाच डी क्युबर्टीनचे ऑलिंपिकविषयीचे विचार ऐकले.



1920 साली बेल्जियममधील *अँटवर्प* शहरात झालेल्या ऑलिंपिकनंतर IOC ने निर्णय घेतला की त्यांच्याकडे बर्फात खेळण्याचे अनेक खेळ होते. त्यामुळे त्यांनी वेगळ्या *हिवाळी ऑलिंपिक स्पर्धा* सुरू केल्या.




पहिल्या हिवाळी ऑलिंपिक स्पर्धा 1924 साली फ्रान्समधील *शामोनी* गावात झाल्या. त्यामध्ये *स्कीइंग, फिगर स्केटींग* आणि *बर्फातील हॉकी* हे खेळ सामील होते. 1992 पासून हे हिवाळी खेळ उन्हाळी ऑलिंपिकनंतर दोन वर्षांनी होऊ लागले.

दर वर्षी ऑलिंपिकमध्ये अधिकाधिक लोकप्रिय खेळांची भर पडू लागली. 1896 साली (अथेन्स) 9 खेळांच्या 52 स्पर्धा झाल्या. 1952 साली (*हेलसिंकी*, फिनलंड) 17 खेळांच्या 149 स्पर्धा झाल्या. 2004 साली अथेन्समध्ये 28 खेळांच्या 301 स्पर्धा झाल्या.

अगदी अलिकडेच 1976 (*इन्सब्रुक*, ऑस्ट्रेलिया) साली *बर्फावरचे नृत्य*देखील या खेळांमध्ये सामिल करण्यात आले.

1996 मधील बीच व्हॉलीबॉल

(*अटलांटा*, अमेरिका)





आणि 1998 मध्ये, स्नो बोर्डींग

(*नागानो*, जपान)



2008 साली, चीनच्या *बीजिंग* शहरात झालेल्या स्पर्धेत बीएमएक्स *सायकलिंग खेळ* सामील करण्यात आला.



....आणि 10 किमी (6 मैल) *मॅराथॉन पोहोण्याची शर्यत*सुद्धा.



दुसऱ्या महायुद्धानंतर, पाठीच्या मणक्याला इजा झालेल्या ज्येष्ठ सैनिकांसाठी इंग्लंडच्या *स्टोक मँदेविल* गावात एक स्पर्धा आयोजीत करण्यात आली.

ही स्पर्धा खूप यशस्वी ठरली. मग 1960 मध्ये, अपंग मैदानी खेळाडुंसाठी पहिली आंतरराष्ट्रीय *पॅराऑलिंपिक स्पर्धा* आयोजीत करण्यात आली.




यानंतर 1976 मध्ये पहिले *हिवाळी पॅराऑलिंपिक* झाले.


प्रकरण 7

सोहळे-समारंभ

ऑलिंपिक स्पर्धांचा उद्घाटन सोहळा एखाद्या कार्निवल उत्सवासारखा असतो.

मैदानी खेळाडुंची एक मोठी कवायत निघते. मग संगीत, प्रकाश, नृत्य आणि रंगीबेरंगी आतिशबाजी यांचे अद्भूत प्रदर्शन होते.





ऑलिंपिक गीत गायल्यानंतर, ऑलिंपिक स्पर्धेचा झेंडा फडकवण्यात येतो. डी क्युबर्टीन यांनी झेंड्यावर पाच रंगांची वर्तुळे आरेखित केली होती. ही वर्तुळे जगातील पाच खंडांचे प्रतिनिधित्व करतात. आफ्रिका, अमेरिका, आशिया, ऑस्ट्रेलिया आणि युरोप – सर्व खंड शांतता आणि सद्भावनेच्या हेतूने या स्पर्धेत एकत्र आलेले.

स्पर्धा सुरू होण्याच्या काही महिने आधी, ऑलिंपियामध्ये एक मशाल पेटवतात. ही मशाल धावत, आकाशमार्गे, रस्तेमार्गे, रेल्वेमार्गे वा पाण्यातून ठराविक अंतराने नवनव्या ताज्या दमाच्या खेळाडुंद्वारे (रिले पद्धतीने) नेली जाते.

शेवटी, एक धावपटू ही मशाल मैदानातील उद्घाटन सोहळ्यात आणतो आणि मशालीने एका भव्य कढईत ज्योत पेटवतो.



स्पर्धा संपेपर्यंत कढईतील ज्योत सतत जळत राहाते.

प्राचीन स्पर्धांमध्येही एक ज्योत सतत जळत ठेवली जात असे.

प्रकरण 8

ऑलिंपिक हिरो

बर्लिनमध्ये 1936 मध्ये *अॅडॉल्फ हिटलरच्या* शासनकाळात ऑलिंपिक स्पर्धा भरवण्यात आल्या होत्या.



जर्मनीच्या खेळाडुंचे शक्तीप्रदर्शन करण्यासाठी हिटलर मोठा उत्सुक होता. पण अमेरिकेच्या *ओहायो* शहराचा एक कृष्णवर्णीय धावपटू *जेसी ओवेन्स* हा त्या स्पर्धेचा हिरो ठरला.



जर्मनांशी कठोर स्पर्धा करूनही ओवेन्सने चार सुवर्णपदके जिंकली – 100 मीटर आणि 200 मीटर दौड, लांब उडी आणि 100 मीटर रिले शर्यत.

ओवेन्समुळे *कार्ल लुईस*समवेत अनेक अमेरिकी धावपटुंना प्रेरणा मिळाली. 1984 सालच्या ऑलिंपिक स्पर्धेत, लुईसने ओवेन्सइतक्याच स्पर्धा जिंकल्या.



लुईसने लांब उडीत चार ऑलिंपिक खेळांत मिळून विस्मयकारकरित्या चार सुवर्णपदके जिंकली.

लुईसच्या नऊ सुवर्णपदकांची बरोबरी फिनलंडचा दूर अंतराचा धावपटू *पावो नुरमी (फ्लाईंग फिन)* याच्या विक्रमाशी होऊ शकते. नुरमीने 1920, 1924 आणि 1928 च्या ऑलिंपिक स्पर्धांमध्ये सुवर्णपदके जिंकली होती.



1948 सालच्या लंडन ऑलिंपिकमध्ये, एक डच धावपटू, *फॅनी ब्लॅंकर*, ही आंतरराष्ट्रीय हिरो बनली. वयाच्या 30 व्या वर्षी, ती दोन मुलांची आई होती. लोकांना तिच्या यशाची फारशी खात्री नव्हती. पण तिने 100 मीटर, 200 मीटर, 80 मीटर अडथळ्यांची शर्यत आणि 4 × 100 मीटर रिले यांत सुवर्णपदके जिंकली.






1968 च्या *मेक्सिको सिटी* ऑलिंपिकच्या विजेत्या ताऱ्यांमध्ये एक होता, अमेरिकेचा *बॉब बीमन*. त्याने लांब उडीत 8.9 मीटर (34 फूट) अंतर पार केले आणि जुना जागतिक विक्रम 55 सेमी (22 इंच) अंतर जास्त कापून मागे टाकला.

यामुळे बीमनच्या भावना एवढ्या अनावर झाल्या की आपल्या गुडघ्यांवर बसून तो म्हणाला, *मी स्वप्नात तर नाही ना, याची मला कुणीतरी खात्री पटवून द्या.* त्याचा हा विक्रम पुढील 23 वर्षे अबाधित राहिला.

1972 च्या *म्युनिक* ऑलिंपिकमध्ये, अमेरिकी तरणपटू *मार्क स्पिट्झ* याने एकाच आठवड्यात सात सुवर्णपदके जिंकली आणि सात जागतिक विक्रम नोंदवले.




कॅनडाच्या *मॉंट्रीयल* शहरात 1976 या वर्षीच्या स्पर्धेत, 14 वर्षांच्या रुमानियन कसरतपटू (जिम्नॅस्ट) *नादीया कोमेनेसी*ने प्रेक्षकांचे डोळे दिपवून टाकले.



ती दहा अंक मिळवणारी पहिली कसरतपटू होती. ती सहा खेळांमध्ये 10 वेळा जिंकली. पण गुणफलकाच्या मर्यादेमुळे तिचे गुण फक्त 1 एवढेच दिसत होते.

ब्रिटीश नौकानयनपटू, *स्टीव्ह रेडग्रेव्ह*, याने ऑस्ट्रेलियाच्या *सिडनी* शहरातील, ई.स. 2000 सालच्या ऑलिंपिकमध्ये, एक इतिहास रचला. स्पर्धा जिंकल्यावर, तो पाचही ऑलिंपिकमध्ये या प्रकारातील खेळात सुवर्णपदक मिळवणारा पहिला खेळाडू ठरला.





पूर्व जर्मनीची निपुण नौकानयनपटू *बिरगीट फिशर* हीने वयाच्या 18 व्या वर्षी, 1980 च्या *मॉस्को* ऑलिंपिकमध्ये आपले पहिले सुवर्णपदक जिंकले. तिने आपले आठवे सुवर्णपदक 24 वर्षांनी 2004 सालच्या अथेन्स ऑलिंपिकमध्ये संपूर्ण जर्मन राष्ट्रासाठी जिंकले. ही तिची सहावी ऑलिंपिक स्पर्धा होती. तिची ही कामगिरी अविश्वसनीय होती.

आज ऑलिंपिक हा जगातील सर्वात मोठा क्रीडा उत्सव बनला आहे.

प्राचीन ऑलिंपिक स्पर्धा 1000 वर्षांपेक्षा जास्त काळ चालल्या. प्रत्येक स्पर्धेचा कालावधी काही दिवसांइतका दीर्घ असे. आधुनिक ऑलिंपिक स्पर्धांचे वय फक्त 100 वर्षे इतकेच आहे. पण प्रत्येक स्पर्धा तेवढ्याच कालावधीसाठी भरवली जाते.



आधुनिक स्पर्धाही 1000 वर्षे चालल्या तर ई.स. 3062 सालीसुद्धा लोक ऑलिंपिक स्पर्धा पाहातील आणि खेळतील....





उन्हाळी ऑलिंपिक तारखा



1896 अथेन्स, ग्रीस
1900 पॅरिस, फ्रान्स
1904 सेंट लुईस, अमेरिका
1908 लंडन, यूके
1912 स्टॉकहोम, स्वीडन
1916 आयोजन नाही (महायुद्ध)
1920 अँटव्हर्प, बेल्जियम
1924 पॅरिस, फ्रान्स
1928 ॲमस्टरडॅम, नेदरलँड्स
1932 लॉस एंजेल्स, युएसए
1936 बर्लिन, जर्मनी
1940 आयोजन नाही (महायुद्ध)
1944 आयोजन नाही (महायुद्ध)
1948 लंडन, यूके
1952 हेलसिंकी, फिनलँड
1956 मेलबर्न, ऑस्ट्रेलिया
1956 स्टॉकहोम, स्वीडन
1960 रोम, इटली
1964 टोकियो, जपान
1968 मेक्सिको सिटी, मेक्सिको
1972 म्युनिक, जर्मनी
1976 मॉन्ट्रियल, कॅनडा
1980 मॉस्को, रशिया
1984 लॉस एंजेल्स, यूएसए
1988 सेऊल, कोरिया
1992 बार्सिलोना, स्पेन
1996 अटलांटा, अमेरिका
2000 सिडनी, ऑस्ट्रेलिया
2004 अथेन्स, ग्रीस
2008 बीजिंग, चीन
2012 लंडन, यूके





हिवाळी ऑलिंपिक तारखा



1924 शामोनि, फ्रान्स
1928 सेंट मॉरित्झ, स्वित्झर्लंड
1932 लेक प्लॅसिड, अमेरिका
1936 गार्मिश पॅटर्नकिचेन, जर्मनी,
1940 आयोजन नाही (महायुद्ध)
1941 आयोजन नाही (महायुद्ध)
1948 सेंट मॉरित्झ, स्वित्झर्लंड
1952 ओस्लो, नॉर्वे
1956 कॉर्टिना डी'एम्पेझो, इटली
1960 स्क्वॉ व्हॅली, यूएसए
1964 इन्सब्रुक, ऑस्ट्रिया
1968 ग्रेनोबल, फ्रान्स
1972 सप्पोरो, जपान
1976 इन्सब्रुक, ऑस्ट्रिया
1980 लेक प्लॅसिड, अमेरिका
1984 साराजेव्हो, यूगोस्लाविया
1988 कॅलगरी, कॅनडा
1992 अल्बर्टविले, फ्रान्स
1994 लिलेहॅमर, नॉर्वे
1998 नागानो, जपान
2002 सॉल्ट लेक सिटी, यूएसए
2006 ट्युरिन, इटली
2010 व्हॅंकुव्हर, कॅनडा
2014 सोची, रशिया



ऑलिंपिक स्पर्धांची कहाणी

प्राचीन ग्रीसमधील एक उत्सव ते आजचा जागतिक क्रिडा सोहळा या रुपांत ऑलिंपिकने खेळाडू आणि स्पर्धा समर्थकांना नेहमीच प्रेरणा दिलेली आहे. जाणून घ्या, जगातील सर्वात भव्य स्पर्धांचा जन्म कसा झाला. सोबतच, ऑलिंपिक स्पर्धांच्या हिरोंची ओळखही करून घ्या.

